दैनिक **रायगड नगरी**
अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
www.raigadnagari.com
/ raigadnagari
वर्ष २० वे | अंक २६३ | MAHMAR/2006/17212 | रायगड | रविवार, दि.२१ डिसेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

## स्कूल व्हॅन आणि रिक्षाला डंपरची धडक, वाहनांचे मोठे नुकसान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन पनवेल सिग्नल जवळ सिग्नल वर उभ्या असलेल्या स्कूल व्हॅन आणि रिक्षाला पाठीमागून आलेला डंपरने ठोकर मारून अपघात केला. या अपघातात स्कूल व्हॅन आणि रिक्षाचे मोठे नुकसान झाले. या अपघातात रिक्षाचालक, पॅसेंजर तसेच स्कूल व्हॅनमधील दोन मुले जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले.नवीन पनवेल सिग्नल जवळ स्कूल व्हॅन क्रमांक एम एच ४६ बी यु ७१२३ आणि रिक्षा क्रमांक एम एच ४६ सीडी ०९९५ या वाहनांना पाठीमागून आलेला डंपर क्रमांक एम एच ०४ एफ पी ९१४२ ने धडक दिली. अपघातात स्कूल व्हॅनचे दरवाजे लॉक झाल्याने मुले स्कूल व्हॅनमध्ये अडकून पडली. घटनास्थळी आणि आजूबाजूला असणारे पनवेल शहर वाहतूक शाखेचे अधिकारी, अंमलदार यांनी व्हॅनची काचेची खिडकी फोडून व बाजूचे पाईप ओढून बारा मुलांना व्हॅनमधून सुखरूपपणे बाहेर काढले. तसेच रिक्षा चालक हा रिक्षामध्ये अडकल्याने आणि जखमी झाल्याने रिक्षाची फ्रेम ओढून आणि फुटलेली काच तोडून त्याला बाहेर काढण्यात आले. अपघात झाल्यानंतर डंपर चालकाला मारहाण करण्याचा प्रयत्न केला मात्र वाहतूक पोलिसांनी या डंपर चालकाला पनवेल शहर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

# अखेर प्रतीक्षा संपली ; आज मतमोजणी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**




रायगड जिल्ह्यातील दहा नगरपरिषदांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी (दि. २) डिसेंबरला मतदान झाले. एक लाख ६६ हजार ८५८ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. अठरा दिवसांच्या दीर्घ प्रतीक्षेनंतर रविवारी (दि.२१) सकाळपासून मतमोजणीला सुरुवात होणार आहे. नगराध्यक्षांसह नगरसेवकपदाच्या २०९ जागांसाठी ६२९ उमेदवारांपैकी कोणाला शहरी मतदारांनी कौल दिला, याकडे सर्वच राजकीय पक्षांचे लक्ष लागून राहिले आहे. मतमोजणी प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज झाले असून, नगरपरिषद स्तरावर त्याचे नियोजन करण्यात आले आहे. सकाळी दहा वाजल्यापासून मतमोजणीला सुरुवात होणार असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.

रायगड जिल्ह्यातील अलिबाग, खोपोली, श्रीवर्धन, मुरूड-जंजिरा, रोहा, महाड, पेण, उरण, कर्जत, माथेरान या नगरपरिषदांमध्ये नगरसेवकपदासाठी ५९५ व नगराध्यक्षपदासाठी ३४ असे एकूण ६२९ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. नगराध्यक्षपदाच्या दहा आणि नगरसेवकपदाच्या २१७ जागांसाठी मतदान झाले. जिल्ह्यातील दोन लाख ३७ हजार ५०३ मतदारांपैकी एक लाख ६६ हजार ८५८ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. त्यात पुरुष ८३ हजार ९८६ व महिला ८२ हजार ८७१ मतदारांचा समावेश होता. नगरपरिषदेच्या निवडणुकीत महिलांपेक्षा एक हजार ११५ पुरुष मतदारांनी अधिक मतदान केल्याचे आकडेवारीनुसार दिसून आले आहे.

मतमोजणी प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज असून, सुमारे दोन हजारांहून अधिक अधिकारी व कर्मचारी मतमोजणीसाठी नियुक्त केले आहेत. मतमोजणीच्यावेळी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी रायगड पोलिसांकडून कडेकोट बंदोबस्त ठेवला जाणार आहे. उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था करण्यात आली असून, पत्रकार कक्षाचीदेखील व्यवस्था केली असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

# डॉ. शालिनीताई पाटील यांचे ९४ व्या वर्षी निधन

**दै.रायगड नगरी । मुंबई**



महाराष्ट्राच्या ज्येष्ठ नेत्या, माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतदादा पाटील यांच्या पत्नी, माजी मंत्री, माजी खासदार डॉ. शालिनीताई पाटील यांचे शनिवारी दुपारी ३ वाजून ४८ मिनिटांनी माहीम मुंबई येथील ज्योती सदन या निवासस्थानी निधन झाले. त्या ९४ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून, दोन मुली, जावई, नातवंडे व परतवंडे असा परिवार आहे.

सत्यशोधक विचारांचे प्रणेते ज्योतिजीराव फाळके पाटील यांच्या त्या कन्या होत. त्यांनी कायद्याचे शिक्षण घेत वकिलीची पदवी घेतली होती. सांगली जिल्हा लोकल बोर्डाच्या अध्यक्ष म्हणून त्यांनी राजकीय कारकीर्दीस सुरुवात केली. विचारस्वातंत्र्य, सामाजिक न्याय आणि निर्भीड राजकीय भूमिका यासाठी ओळखल्या जाणाऱ्या डॉ. शालिनीताई पाटील यांनी आपल्या प्रदीर्घ सार्वजनिक जीवनात वेगळी छाप उमटवली.

माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या निकटवर्तीय म्हणून ओळख असलेल्या डॉ. शालिनीताई पाटील यांनी खासदार व आमदार म्हणून प्रभावी कामगिरी बजावली. राज्याच्या महसूल मंत्री म्हणून त्यांची कारकीर्द विशेष गाजली.

# विमानतळाला दिबांचेच नाव ; काँग्रेसचा एल्गार

**दै.रायगड नगरी । अलिबाग**




नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळास लोकनेते दि. बा. पाटील यांचेच नाव देण्याचा आग्रह मुंबईत झालेल्या पत्रकार परिषदेत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी धरला. विमानतळाला दिबांचेच नाव हा काँग्रेसचा एल्गार भाजपच्या टोलवाटोलवीच्या राजकारणाला धोबीपछाड देणारा ठरणार आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते, माजी खासदार दि.बा.पाटील यांचेच नाव द्यावे यासाठी दिनांक २२/१२/२०२५ पासून महाविकास आघाडीसह सर्वपक्षीय दिबाप्रेमींचे निर्णायक आंदोलन होत आहे. अभी नही तो कभी नही या तत्त्वानुसार आंदोलनात आता जनता मोठ्या प्रमाणात सहभागी होणार आहे.

सर्व राजकीय पक्ष आंदोलनासाठी पुरेपूर तयारीत आहेत. त्यामुळे या जन आंदोलनास काँग्रेस पक्षानेही संपूर्ण पाठींबा दर्शविला असून भाजपाने या नावास विरोध करण्याचा प्रयत्न केला तर प्रचंड मोठे जनआंदोलन उभारण्याचा इशारा दिला आहे.

नामकरणाच्या या लढ्यात अलिबाग, उरण, पनवेलचे स्थानिक काँग्रेस नेते पहिल्यापासून सहभागी आहेत. त्यामुळे वरिष्ठ स्तरावरूनही काँग्रेस पक्षाने या आंदोलनात सहभागी व्हावे, भुमीपुत्रांच्या मागणीला सहकार्य करावे. म्हणून माजी आमदार स्वर्गीय मधुकर ठाकूर यांचे चिरंजीव काँग्रेस नेते राजाभाऊ ठाकूर आग्रही होते. या आंदोलनाबाबत राजाभाऊंनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना विनंती केली होती. त्यानुसार मुंबईत पत्रकार परिषद घेऊन काँग्रेसने आंदोलनात सहभागी होण्याचे जाहीर करून नामकरणाच्या भाजपच्या टोलवाटोलवीच्या राजकारणाला धोबीपछाड दिला.

या पत्रकार परिषदेला ज्येष्ठ काँग्रेस नेते, उपाध्यक्ष आर.सी. घरत, रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत, काँग्रेस नेते राजाभाऊ ठाकूर, पनवेल शहर जिल्हाध्यक्ष सुदाम पाटील, महासचीव मिलिंद पाडगावकर, मच्छीमार सेल प्रदेशाध्यक्ष मार्तंड नाखवा उपस्थित होते.

### पनवेल महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर...

# भाजपविरोधात मजबूत आव्हान उभे करण्यासाठी महाविकास आघाडी सज्ज

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महापालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीतील अंतर्गत घडामोडींना वेग आला असून, विखुरलेली मते एकत्र आणत भाजपविरोधात मजबूत आव्हान उभे करण्याचे प्रयत्न अंतिम टप्प्यात आले आहेत. शेकाप महाविकास आघाडीतील काही माजी नगरसेवकांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर निर्माण झालेल्या राजकीय पोकळीची जाणीव ठेवत उरलेल्या घटक पक्षांना एकत्र बांधून सामूहिक रणनीती आखण्यावर आघाडीतील नेत्यांचा भर आहे.

पनवेल येथील मार्केट यार्ड कार्यालयात झालेल्या उमेदवारी वाटपाबाबतच्या महत्त्वाच्या बैठकीत सर्वांना सोबत घेऊनच निवडणूक लढवायची अशी भूमिका स्पष्ट करण्यात आली. शेकापचे माजी आमदार बाळाराम पाटील यांनी या वेळी एकसंघपणे ध्यान दिव्या केला असला तरी कोणत्या पक्षाला किती जागा देण्यात येणार याचे अंतिम सूत्र अद्याप ठरलेले नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. काही प्रभागांत बोलणी पूर्ण झाली असली तरी अनेक प्रभागात अजूनही बोलणी सुरू असल्याचे महाविकास आघाडीच्या नेत्यांनी स्पष्ट केले. मागील विधानसभा निवडणुकीत शिवसेना (ठाकरे गट) महाविकास आघाडीतून वेगळी लढल्यामुळे पनवेलमध्ये विरोधकांना फटका बसला होता. त्या अनुभवातून धडा घेत या वेळी शिवसेना ठाकरे गटासह खारघर फोरमसारख्या स्थानिक प्रभावी घटकांना सोबत घेण्याची तयारी महाविकास आघाडीने दर्शविली आहे. त्यामुळे आघाडीच्या बैठकींना खारघर फोरमच्या अध्यक्षा व माजी नगरसेविका लीना गरड यांची उपस्थिती लक्षणीय ठरत आहे.

मागील वर्षी निवडणुकीतील आकडेवारीनुसार भाजपचे आमदार प्रशांत ठाकूर यांना १,८२,८१८ मते, मिळून ते विजयी झाले. तर बाळाराम पाटील यांना १,३२,२३५ आणि लीना गरड यांना ४३,५०४ मते मिळाली होती. या मत समिकरणामुळे जागावाटपात गरड आणि ठाकरे गटाचे महत्त्व वाढल्याची चर्चा आहे. दरम्यान, मनसेची महाविकास आघाडीसोबत प्राथमिक वाटाघाटी सुरू असल्याने प्रत्येक प्रभागात भाजप उमेदवारांची कोंडी करण्यासाठी एकच विरोधी उमेदवार देण्याची रणनीती आखली जात आहे. या बैठकीस शिवसेनेचे उपनेते बबनदादा पाटील,शेकापचे मा आमदार बाळाराम पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख शिरीष घरत, शेकापचे काशिनाथ पाटील, राष्ट्रवादी (शरद पवार गट) सतीश पाटील, समाजवादी पक्षाचे अनिल नाईक, शेकापचे प्रकाश म्हात्रे, मनसेचे प्रवक्ते योगेश चिले, खारघर फोरमचे पदाधिकारी उपस्थित होते.

### मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णायक निकाल

# माणगाव शहरातील अनधिकृत दुकाने अखेर तोडणार

**दै.रायगड नगरी । माणगाव**



माणगाव शहराच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आणि दूरगामी परिणाम करणारा निकाल मुंबई उच्च न्यायालयाने दिला असून, मुंबई-गोवा महामार्गावरील अनधिकृत व बेकायदेशीर दुकाने तसेच अतिक्रमणे तात्काळ हटवून ती तोडण्याचे स्पष्ट आदेश न्यायालयाने दिले आहेत. या निकालामुळे अनेक वर्षांपासून अतिक्रमणांच्या विळख्यात अडकलेला महामार्ग अखेर मोकळा होण्याचा मार्ग मोकळा झाला असून, प्रशासनाच्या भूमिकेला न्यायालयीन पाठबळ मिळाले आहे.

माणगाव शहरातून जाणारा मुंबई-गोवा महामार्ग हा कोकणातील महत्त्वाचा दळणवळण मार्ग आहे. मात्र गेल्या अनेक वर्षांत महामार्गाच्या दुतर्फा अनधिकृत दुकाने, टपऱ्या आणि तात्पुरती बांधकामे उभी राहिल्याने वाहतूक कोंडी, अपघातांची भीती आणि शहराच्या नियोजनावर विपरीत परिणाम होत होता. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते जलाल यांनी या अतिक्रमणांविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

या प्रकरणी सुनावणीदरम्यान न्यायालयाने यापूर्वीही संबंधित यंत्रणांना अतिक्रमणे हटवून महामार्ग मोकळा करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार महामार्ग कार्यालयाच्या वतीने माणगाव नगरपंचायत, जुन्या पंचायत समिती कार्यालयासमोरील भाग तसेच मुंबई-गोवा महामार्गालगत असलेल्या सर्व अनधिकृत दुकानदारांना वारंवार नोटीसा बजावण्यात आल्या होत्या. मात्र या नोटिसांकडे दुर्लक्ष करत दुकानदारांनी आपली दुकाने कायम ठेवली होती.

या प्रकरणातील महत्त्वाचा मुद्दा असा होता की, संबंधित दुकाने नगरपंचायत, पंचायत समिती तसेच शासकीय जागेवर अनधिकृतरीत्या उभारण्यात आली होती. तथापि, काही दुकानदारांकडून नगरपंचायतमार्फत नाममात्र भाडे, पाणीपट्टी तसेच विविध कर वसूल करण्यात येत असल्याने आमची दुकाने अधिकृत असल्याचा दावा दुकानदारांनी न्यायालयात केला होता. पंचायत समिती व रायगड जिल्हा परिषदेकडूनही दुकान कर आकारला जात असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला.

मात्र, फक्त कर किंवा भाडे वसूल केल्याने अतिक्रमण अधिकृत ठरत नाही, हा महत्त्वाचा मुद्दा ग्राह्य धरत उच्च न्यायालयाने दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकून बुधवार, दिनांक १७ डिसेंबर रोजी माणगाव नगरपंचायतीच्या बाजूने स्पष्ट आणि ठाम निकाल दिला आहे. न्यायालयाने या सर्व अतिक्रमणांना अनधिकृत ठरवत तात्काळ हटवून ती तोडण्याचे आदेश दिले आहेत.

या निकालामुळे माणगाव शहरातील शहररचना, वाहतूक व्यवस्थापन आणि महामार्गावरील सुरक्षितता यामध्ये मोठा बदल होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दीर्घकाळ प्रलंबित असलेला हा प्रश्न अखेर न्यायालयीन निर्णयामुळे मार्गी लागला असून, आता प्रशासनाकडून प्रत्यक्ष कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# विमानतळाला दिबा पाटलांचे नाव न दिल्याने २७ गावांचा मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय

**दै.रायगड नगरी । पनवेल**

केंद्र सरकारने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दिबा पाटील यांचे नाव अद्यापपर्यंत न दिल्याने पनवेल तालुक्यातील २७ गावांनी भविष्यात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था, महानगरपालिका, विधानसभा, लोकसभा निवडणुकी अंतर्गत मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतचे पत्र जिल्हाधिकारी, पनवेलचे तहसीलदार यांना देण्यात आले. यावेळी लोकनेते दिबा पाटील २७ गाव प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्थेचे अध्यक्ष नंदराज मुंगाजी, सचिव प्रेम पाटील यांच्यासह अनेकजण उपस्थित होते.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प निर्माण करण्यासाठी तालुक्यातील अनेक गावातील घरे आणि शेतजमिनी सिडकोने संपादित केली. पनवेल तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनीवर उभारलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दिबा पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ असे नामकरण व्हावे अशी येथील भूमिपुत्रांची, शेतकऱ्यांची मागणी आहे. महाराष्ट्र शासनाने या विमानतळाला दिबा पाटील यांचे नाव द्यावे अशी मंजुरी घेऊन त्या मंजुरी प्रमाणे केंद्र शासनाला शिफारस करण्यात आली आहे. मात्र केंद्रशासन नाव देण्यासाठी विलंब करत आहे. ८ ऑक्टोबर रोजी पंतप्रधानांच्या हस्ते या विमानतळाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी विमानतळाला लोकनेते दिबा पाटील यांचे नाव देतील अशी आशा येथील शेतकऱ्यांना होती. मात्र यावेळी दिबा पाटील यांचे नाव देण्याचे जाहीर झाले नाही. त्यामुळे शेतकरी वर्ग, नागरिक यांच्यात असंतोष पसरला आहे. या असंतोषाचा उद्रेक होऊन चिंचपाडा, कोपर, कोल्ही, वाघिवली वाडा, वरचे ओवळे, उलवे, कोंबडभुजे, तरघर, गणेशपुरी, वाघिवली, पारगाव, दापोली, खालचे ओवळे, भंगारपाडा (श्रीराम नगर), कुंडेवहाळ, माणघर, काळुंद्रे, मोसारे, पाटनोली, गराडे, नानोशी, बेलवाडी ई. गावांनी आगामी मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे.



## एका ध्येयवेड्या सैनिकाची अचाट पृथ्वी प्रदक्षिणा

जग वेगाच्या चाकावर स्वार झालं आहे. प्रत्येकाला प्रत्येक गोष्ट अतिशय झटपट हवी आहे. अशा जगात एक व्यक्ती आहे जो आपल्या पायातल्या ताकदीवरचा विश्वास टिकवून आहे. कार्ल बशबी त्याचं नाव. आपल्या लक्ष्यापर्यंत पोहोचण्यासाठी आधुनिक जगातली वेगवान चाकं नाकारून तो पायी चालत निघाला आहे. २७ वर्षांपूर्वी सुरू केलेला त्याचा पायी प्रवास आजही सुरूच आहे. हा प्रवास जेव्हा तो पूर्ण करेल तेव्हा त्याने पृथ्वीची पायी प्रदक्षिणा पूर्ण केलेली असेल! इंग्लंडमधील यॉर्कशायर परगण्यातील हल हे एक बंदरशहर आहे. या शहरातील ५६ वर्षांचा कार्ल बशबी हा माजी ब्रिटिश पॅराट्रूपर आहे. विमानातून थेट पॅराशूटने शत्रूच्या प्रदेशात उतरून कारवाई करण्याचं साहस त्याने अनेकदा दाखवलं. सैन्यात असताना वेगवेगळ्या मोहिमांच्या निमित्ताने त्याचं प्रवासावर प्रेम जडलं. वेगवेगळ्या ठिकाणी जाण्याचं आणि अनुभव घेण्याचं वेडच त्याला लागलं. निवृत्तीनंतरच्या आयुष्यात ध्येय आणि साहस असायला हवं असं वाटत असतानाच त्याने पृथ्वीला पायी प्रदक्षिणा घालण्याची मोहीम आखली. या अचाट मोहिमेला त्याने गोलिएथ एक्स्पिडिशन' असं नाव दिलं. ही साहसी मोहीम आखताना सुरुवातीला त्याने आठ वर्षांची कालमर्यादा ठरवली होती. पण आज २७वर्षानंतरही तो आपल्या लक्ष्याच्या दिशेने चालतोच आहे. अनेक खंडातून पायपीट करत, टोकाच्या भौगोलिक प्रदेशातून प्रवास करताना कार्लने असंख्य अडचणी, अडथळे आणि समस्यांचा सामना केला. उत्तर कोलंबिया आणि दक्षिण पनामा ओलांडल्यावर ९७ किलोमीटरच्या रेनफॉरेस्टने, अमेरिका आणि रशिया दरम्यानच्या बर्फाळ सामुद्रधुनीने कार्लची परीक्षा पाहिली. गोठवणाऱ्या थंडीत सामुद्रधुनी पार करण्यासाठी त्याला १४ दिवस चालावं लागलं. आता त्याचा कस लागणार आहे तो फ्रान्स आणि इंग्लंडला वेगळं करणाऱ्या 'चॅनेल बोगद्या'त. रेल्वेसाठीच्या बोगद्यातून त्याला चालता येणार नाही. टनेलची देखभाल दुरुस्तीचं काम करणाऱ्या टीमसाठी बनवलेल्या मार्गावर चालण्याचा पर्याय त्याच्यासमोर आहे पण त्यासाठी तेथील नोकरशाहीच्या परवानगी जाचातून त्याला जावं लागणार आहे. त्यासाठी किती वर्ष लागतील हे कार्ललाच माहिती नाही. कार्लला इराण आणि रशियामध्ये सुरक्षितरित्या प्रवेश करणं अशक्य झालं, समुद्रामार्गे जाणं हाच त्याच्यासमोर पर्याय होता, तेव्हा त्याने कझाकस्तान ते अझरबैजान असा प्रवास कॅस्पियन समुद्रात पोहून केला. ३१ दिवस १३२ तास पोहून त्याने १७९ मैल अंतर पार केलं. अझरबैजान आणि तुर्कीमधून चालत तो इस्तंबूलच्या बॉस्फरस सामुद्रधुनीत पोहोचला. १९९८ मध्ये कार्लने जेव्हा प्रवासाला सुरुवात केली तेव्हा त्याच्यासमोर ३६,००० मैलाचा रस्ता होता, पण पायीच प्रवास करायचा यावर तो ठाम होता. २००८ मध्ये मेक्सिकोमध्ये व्हिसा नाकारल्याने तो पाच वर्ष अडकून पडला. रशियाने त्याच्यावर पाच वर्षाची बंदी घातली. त्याच्या मोहिमेच्या प्रायोजकांनी साथ सोडल्याने कार्ल मोठ्या आर्थिक अडचणीत सापडला, पण त्याने प्रवास थांबवला नाही. आता कार्ल युरोप खंडात हंगेरी येथे आहे. तो त्याच्या लक्ष्यापासून ९३२ मैल दूर आहे. सप्टेंबर २०२६ मध्ये तो हलला पोहोचेल. २७ वर्ष रोज नवीन आव्हानांना छातीवर घेणाऱ्या कार्लला घरी गेल्यावर काय करायचं हे मात्र सूचत नाहीये.

# पोस्को कंपनीची प्रेरणादायी सामाजिक बांधिलकी; मुक्तक जोशी यांचे शाश्वत शेतीवर मार्गदर्शन

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

विळेभागाड औद्योगिक वसाहत, ता. माणगांव, जि. रायगड येथील नामांकित पोस्को महाराष्ट्र स्टील मल्टीनॅशनल कंपनीत तालुक्यातील स्थानिक शेतकरी व पत्रकारांसाठी आयोजित एकत्रित त्रैमासिक चर्चासत्र उत्साहात संपन्न झाले. कंपनीच्या उडठ (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी) उपक्रमांचा आढावा, शाश्वत शेतीकडे वाटचाल, मातीचे आरोग्य आणि एकात्मिक शेती या विषयांवर संभाजीनगर येथील प्रेरणादायी वक्ते मुक्तक जोशी यांनी मार्गदर्शन केले.

या चर्चासत्रास तालुक्यातील १०७ शेतकरी बांधव-भगिनी, १७ पत्रकार तसेच पंचायत समिती कृषी विभागातील ३ अधिकारी असे एकूण १२७ जण उपस्थित होते. आयटी उद्योजक म्हणून यशस्वी कारकीर्द गाजवून, अनेक अपयशांवर मात करत सेंद्रिय शेतीत यश मिळवणारे मुक्तक जोशी हे उच्चशिक्षित शेतकरी म्हणून उपस्थितांसाठी प्रेरणास्थान ठरले.




संभाजीनगर येथे ऑलगॅनिक फार्म चालवून जोशी १०० टक्के नैसर्गिक फळे व भाजीपाला उत्पादन करतात. मोठ्या पॅकेजच्या नोकरीच्या आणि परदे-शात स्थायिक होण्याच्या स्वप्नांपेक्षा शेतीत राबून शेतकऱ्यांना उत्पन्न मिळवून देण्याला त्यांनी प्राधान्य दिले आहे.

वातानुकूलित कक्षात बसून शेतीविषयी सल्ले देण्यापेक्षा प्रत्यक्ष शेतात काम करून संशोधनाच्या आधारे मार्गदर्शन करणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी आपल्या व्याख्यानात नमूद केले.

आपल्या व्याख्यानाच्या सुरुवातीलाच पोस्को कंपनीच्या CSR उपक्रमांचा चित्रफितीद्वारे आढावा पाहून असे कार्य इतरत्र कुठेही पाहायला मिळाले नाही, असे सांगत त्यांनी पोस्को कंपनीच्या सामाजिक बांधिलकीचे विशेष कौतुक केले.

मार्गदर्शनाची संधी दिल्याबद्दल त्यांनी कंपनीचे आभार मानले. याप्रसंगी कंपनीच्या CSR प्रमुख कुलदीप पुरंदरे व अधिकारी स्वप्निल पाटील यांनी प्रास्ताविक केले. तसेच कंपनी व्यवस्थापनप्रमुख महेंद्र तट्टे यांच्या हस्ते मुक्तक जोशी यांचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

ग्रामीण भागातील होतकरू शेतकरी, क्रियाशील युवक व नवउद्योजकांना नाविन्यपूर्ण मार्गदर्शन देत पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनी खऱ्या अर्थाने सामाजिक बांधिलकी जपत समाजप्रबोधनाचे कार्य करीत असल्याबद्दल उपस्थित शेतकरी बांधवांनी समाधान व्यक्त केले.

## वरदायिनी विद्यालय महागाव माध्यमिक शाळेस माजी विद्यार्थ्यांकडून सीसीटीव्ही कॅमेरे भेट

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुक्यातील वरदायिनी विद्यालय महागाव माध्यमिक शाळेस इयत्ता १० वी सन १९९५ ९६ च्या बॅचने २५ हजार रुपये किंमतीचे सीसीटीव्ही कॅमेरे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने देणगी स्वरूपात भेट दिले. ही भेट माजी विद्यार्थी सुनिल बयकर, धर्मा राणे, गणेश मानकर, मंगेश महाडिक, नितीन तांबट, तुकाराम कदम, सचिन घाडगे, कुंदन पवार, संतोष कजबले, अरूण मोरे, संदेश कडव, इत्यादींनी सदर भेट शाळेच्या मुख्याध्यापकांकडे दिली. याचवेळी शाळेच्या वतीने माजी विद्यार्थ्यांचे पत्र देऊन आभार व्यक्त करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महागाव शाळेला सीसीटीव्ही कॅमेऱ्याची आवश्यकता होती. शाळेची ही गरज ओळखून माजी विद्यार्थ्यांकडून शाळेला सीसीटीव्ही कॅमेरे भेट स्वरूपात देण्यात आले. सदर सीसीटीव्ही कॅमेरे दिल्याने शाळेचा परिसर कॅमेऱ्यामध्ये आला असून शाळेच्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला यामुळे आधार मिळाला आहे.

तळा तालुक्यातील वरदायिनी विद्यालय महागाव ही माध्यमिक शाळा अत्यंत दुर्गम असून त्या ठिकाणी आज १६० मुले ५ वी ते १० चे शिक्षण घेत आहेत. ग्रामीण भाग असल्याने या मुलांना अनेक सोयी सुविधा पासून वंचित रहावे लागत आहे.काही दिवसांपूर्वी या शाळेतील १२ पंखे चोरीला गेले होते. निर्जन ठिकाणी शाळा असल्याने त्या ठिकाणी सीसीटीव्ही ची नितांत गरज होती.या शाळेचे माजी विद्यार्थी म्हणून एक सामाजिक जाण आणि भान लक्षात घेऊन माजी विद्यार्थ्यांनी केलेली मदतीचे कौतुक होत आहे. मंगळवार दि.१६/१२/२०२५ रोजी स्कूल कमिटी चेअरमन लक्ष्मण साळवी यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन करण्यात आले.तसेच मायबाप फाऊंडेशन च्या माध्यमातून तळा तालुक्यातील माध्यमिक शाळेतील मुलांना छचचड ८ वी परिक्षेसाठी आवश्यक प्रश्नसंच या वर्षी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तसेच डायरी लेखन या उपक्रमांतर्गत तळा तालुक्यातील मुले व शिक्षक यांना ५०० डायरी व पेन चे वाटप करण्यात आले आहे. दानशूर मित्रांच्या सहकार्यामुळेच आज आम्ही ज्या शाळेत शिकलो त्या शाळेला खारीचा वाटा उचलून छोटीसी मदत करता आली याचे समाधान आहे असे मायबाप फाऊंडेशनचे अध्यक्ष सुनील बैकर यांनी मत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे लक्ष्मण साळवी, किशोर तायडे,धर्मा राणे ,रोशन फराडे उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक व्यवहारे यांनी केले तर सूत्रसंचालन माळी यांनी केले.

# ना.प्रवीण दरेकर यांच्या स्थानिक विकास निधीतून करंजखोल साठी कचरा संकलन घंटागाडी

**दै.रायगड नगरी । महाड**

भाजपाचे विधान परिषद सदस्य तथा राज्य गृहनिर्माण स्वयं समूह पुनर्विकास प्राधिकरण अध्यक्ष नामदार प्रवीण दरेकर यांच्या स्थानिक विकास निधीतून महाड तालुक्यातील करंजखोल ग्रामपंचायतीसाठी एक आधुनिक कचरा संकलन घंटागाडी उपलब्ध करून देण्यात आली आहे. शुक्रवार, १९ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित एका विशेष कार्यक्रमातून सदर घंटागाडी ग्रामपंचायत प्रशासनाच्या सुपूर्द करण्यात आली.

याप्रसंगी भाजपा राज्य परिषद सदस्य बिपीन म्हामुणकर, गटविकास अधिकारी उदयसिंह साळूंखे, सरपंच सुनिता महाडीक, उपसरपंच दिव्या उंडरे, उत्तर मंडल अध्यक्ष निलेश देवगिरकर, दक्षिण मंडल अध्यक्ष निलेश तळवटकर,प्रसिद्धी संयोजक महेश शिंदे, युवा मोर्चा अध्यक्ष प्रविण महाडीक,ग्रा सदस्य विनोद डिघे, वाहतूक सेल अध्यक्ष नाना पोरे, चंद्रजित पालांडे,गोंडाळे सरपंच आशिष खताते, शहर अध्यक्ष अप्पा सोंडकर,योगेश ताबडे शिवाजी दरेकर विकास दरेकर, यांच्यासह ग्रामपंचायत आजी माजी सदस्य,भाजपा कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

मागील कालावधी दरम्यान नामदार प्रवीण दरेकर यांनी करंजखोल परिसरास भेट दिली असता, छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ले रायगडकडे जाणाऱ्या प्रवेशद्वाराजवळील परिसरात ठिकठिकाणी साचलेला कचरा त्यांच्या निदर्शनास आला होता. यावेळी करण्यात आलेल्या पाहणीत गावात कचरा निर्मूलनासाठी आवश्यक यंत्रणा अपुरी असल्याचे लक्षात आले. याबाबत बिपीन महामुणकर व स्थानिक कार्यकर्त्यांकडून माहिती घेऊन नामदार दरेकर यांनी तात्काळ ग्रामपंचायतीसाठी घंटागाडी उपलब्ध करून देण्याची ग्वाही दिली होती. त्यानुसार पाठपुरावा करून ही घंटागाडी करंजखोल ग्रामपंचायतीला प्रदान करण्यात आली आहे.

ही घंटागाडी पेट्रोल व सीएनजी या दुहेरी इंधन प्रणालीवर चालणारी असून कमी इंधन खर्च व अल्प देखभाल खर्चामुळे ग्रामपंचायतीवरील आर्थिक भार कमी होणार आहे. तसेच या गाडीत ओला व सुका कचरा वेगवेगळ्या पद्धतीने संकलित करण्याची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आलेली आहे. ग्रामपंचायतीच्या वतीने महाड नगर परिषदेसोबत समन्वय साधून संकलित कचरा लाडवली येथील घनकचरा प्रक्रिया केंद्रात पाठविण्याबाबत चर्चा सुरू असून, यासाठी आवश्यक स्वच्छता कर भरण्याबाबतही सकारात्मक विचारमंथन सुरू असल्याचे त्याचप्रमाणे कचरा संकलन व वर्गीकरणासाठी काही स्वयंसेवी संस्था व एनजीओंशी देखील संपर्क साधण्याचे प्रयत्न सुरू राहणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

यावेळी बोलताना बिपीन महामुणकर यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'स्वच्छ भारत - सुंदर भारत' या संकल्पनेला ग्रामीण पा-तळीवर अधिक बळ देण्यासाठी नामदार प्रवीण दरेकर यांच्या माध्यमातून ही घंटागाडी योजना राबविण्यात आली आहे. भविष्यातही अशाच स्वरूपाच्या विविध योजना राबवून ग्रामीण भागातील मूलभूत तसेच नागरी सुविधांच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सदर घंटागाडी उपलब्ध करून दिल्याबद्दल करंजखोल ग्रामपंचायत प्रशासन व ग्रामस्थांच्या वतीने नामदार प्रवीण दरेकर यांना मनापासून धन्यवाद देण्यात येत आहेत.

## तलाठी कार्यालय उरण शहरात कार्यान्वित करण्याची वंचितची मागणी

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील विविध गावातून उरण तहसीलदार कार्यालयात नागरिक विविध शासकीय कामे उदा. जबाब पंचनामा, रेशनकार्ड, जमिनीची कामे आणि इतर विविध कामांसाठी येत जात असतात.त्या नागरिकांना तलाठी साठी उरण वरून जे.एन.पी. टी. टाऊनशिप येथे सात किलोमीटर अंतरापर्यंत विविध वाहनांनी जावे लागत आहे.परंतु जे एन पी टी टाऊनशिप मध्ये कधी कधी काही कारणास्तव तलाठी भेटत नाहीत. त्यामुळे नागरिकांना नाहक त्रास होत आहे या कारणास्तव नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. या विषयावर अनेक तक्रारी वंचित बहुजन आघाडीचे उरण तालुका उपाध्यक्ष तुषार गायकवाड यांच्याकडे प्राप्त झाले होते. आणि तो विषय, समस्या त्यांनी समजून घेतले. व ती समस्या सोडविण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला.

वंचित बहुजन आघाडी उरण तालुका उपाध्यक्ष तुषार गायकवाड यांनी तहसीलदार डॉ. उध्दव कदम यांना पत्रव्यवहार करून सविस्तर चर्चा केली.लवकरच जेएनपीटी वरून पुन्हा उरण शहरात तलाठी कार्यालय सुरु करण्यात येणार असे तहसीलदार उद्धव कदम यांनी आश्वासन दिले. उरण तालुका मधील नागरिकांना त्रास होणार नाही दक्षता घेतली जाईल असे तहसीलदार उद्धव कदम यांनी आश्वासित केले.

मागील अनेक वर्षापासून तालाठी कार्यालय जेएनपीटी वसाहतीमध्ये हटविण्यात आले आहे. यामुळे ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांना विशेष करून जमिनीसंदर्भातील कामकाजासाठी येणाऱ्या वृद्ध नागरिकांना याचा अतोनात त्रास होत आहे.

तर तलाठी कार्यालयात गेल्यावर अनेकदा तालाठी उपलब्ध नसतात. याबाबत विचारणा केल्यास आलेल्या नागरिकांना उद्धट उत्तरे दिली जातात. अशा परिस्थितीमध्ये तलाठी कार्यालयात कामासाठी येणाऱ्या नागरिकांचा वेळ आणि पैसा वाया जात आहे. मात्र यापेक्षा महत्वाचे म्हणजे मानसिक त्रास देखील होत आहे. यासाठी यावर तात्काळ तोडगा काढणे आता महत्वाचे झाले आहे.तलाठी कार्यालय उरण शहरात कार्यान्वित झाल्यास सर्वसामान्य नागरिक, आबालवृद्ध यांचे पैसा श्रम, वेळीची खूप मोठी बचत होणार आहे. त्यामुळे नागरिकांनीही तलाठी कार्यालय उरण शहरात कार्यान्वित करण्याची मागणी केली आहे.

## उरण नगरपरिषदेच्या निवडणूक मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज

**दै.रायगड नगरी । उरण**

आज २१ डिसेंबर रोजी होणाऱ्या उरण नगरपरिषदेच्या मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज असल्याची माहिती उरण निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार डॉ. उद्धव कदम यांनी दिली. नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष व २१ सदस्य पदासाठी अशा एकूण २२ जागांसाठी दहा प्रभागातून मतदान झाले आहे.उरणच्या नगराध्य पदाची माळ कोणाच्या याकडे उरण वासियांचे लक्ष वेधले आहे.



चार वर्षाच्या प्रशासकीय राजवटीनंतर उरण नगरपरिषदेच्या होणाऱ्या निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठी चार उमेदवार व २१ सदस्य पदांसाठी अपक्षांसह विविध राजकीय पक्षांचे एकूण ४९ असे एकूण ५३ उमेदवार रिंगणात उतरले आहेत. उरण नगर परिषदेच्या प्रशासकीय कार्यालयातील सभागृहात रविवारी २१ मतमोजणीला पोलीस बंदोबस्तात सकाळी दहा वाजता सुरुवात केली जाणार आहे. दहा प्रभागासाठी दहा टेबल लावले आहेत. मतमोजणी नंतर दोन तासात सर्वच निकाल जाहीर होतील.

अशी माहिती तहसिलदार उद्धव कदम यांनी दिली. न्यायालयाच्या आदेशानंतर मतमोजणी १८ दिवस लांबणीवर पडली होती.

यादरम्यान उरण नगर परिषदेच्या स्ट्राँग रूममध्ये कडेकोट पोलीस बंदोबस्तात ईव्हीएम मशीन ठेवलेल्या आहेत. पोलिसांबरोबर महाविकास आघाडीच्या उमेदवारांनीही स्ट्राँगरूमवर जागता पहारा ठेवला आहे. शुक्रवारी १९ डिसेंबर रोजी उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पो-लीस निरीक्षक हनीफ मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली उरण शहरात रूट मार्च घेण्यात आला.

## विज्ञान व गणित विषयातील गुणवत्ता वाढीसाठी प्रशिक्षण

**दै.रायगड नगरी । माणगाव**

विज्ञान व गणित विषयातील गुणवत्ता वाढवणे, संशोधन वृत्ती जोपासणे आणि विद्यार्थ्यांमध्ये नाविन्यपूर्ण प्रयोगशीलता विकसित करणे या उद्देशाने ए.के.आय उर्दू हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेज गोरेगाव माणगाव येथे आयराईज अर्थात कॅस्केड प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात पार पडला. विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालय भारत सरकार, आयशर पुणे ब्रिटिश कौन्सिल रॉयल सोसायटी ऑफ केमिस्ट्री टाटा टेक्नॉलॉजी आणि टाटा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. १६ डिसेंबर २५ ते १८ डिसेंबर २५ रोजी जिल्हास्तरीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले.

सहा तालुक्यातील इयत्ता सहावी ते दहावी वर्गांना विज्ञान व गणित विषय शिकवणाऱ्या शिक्षकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला एकूण साठ शिक्षकांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला. प्रशिक्षणाच्या माध्यमातून विज्ञान व गणिताच्या संकल्पना विद्यार्थ्यांपर्यंत सोप्या आणि आकर्षक पद्धतीने कशा पोहोचवायच्या प्रात्यक्षिक प्रयोग प्रत्यक्ष कृती यांच्या साह्याने अध्यापन कसे प्रभावी बनवायचे यावर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्येक प्रशिक्षणार्थीला आयसर पुणे मार्फत आयराईज किट प्रदान करण्यात आले.

जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे ज्येष्ठ अधिव्याख्याता डॉ. कामशेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली व ए के आय उर्दू स्कूल अँड ज्युनियर कॉलेजचे मुख्याध्यापक श्री. मुनीर सर यांच्या उपस्थितीत उद्घाटन झाले.

या प्रशिक्षणासाठी तज्ञ म्हणून उस्मान शेख ,नरेंद्र जाधव, श्रीमती विद्या साबळे , संतोष चौधरी यांनी काम केले तसेच आयसर संस्थेचे भरत ठोंबरे सर हे प्रमुख उपस्थित होते. त्यांनी गणित आणि विज्ञान विषयातील मूलभूत संकल्पना विद्यार्थ्यांपर्यंत नव्या पद्धतीने पोहोचवण्याची आवश्यकता अधोरेखित केली.

त्याचबरोबर त्यांचे सहाय्यक सुलभक यांनीही अतिशय सूक्ष्म पद्धतीने मार्गदर्शन केले. प्रशिक्षण दरम्यान विविध प्रयोग कृती चर्चा सत्र व प्रात्यक्षिकांचा समावेश होता.

शिक्षकांमधील वैज्ञानिक व माहिती कौशल्य वाढवण्यासाठी आयराईज किट चा वापर करून प्रत्यक्ष कृती आधारित सत्र घेण्यात आली. प्रशिक्षणाचा समारोप माणगाव तालुका गटशिक्षणाधिकारी श्रीमती तांबट मॅडम यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. त्यामध्ये सर्व प्रशिक्षणार्थ्यांना प्रशस्तीपत्रक देण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी समन्वयक संतोष बेंदूगडे सर व स्वाती भुस्कुटे मॅडम यांनी नियोजन करुन सहकार्य केले. प्रशिक्षण यशस्वीतेसाठी कार्यालय कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# माथेरानवर कुणाचे वर्चस्व? मतदारांनी कुणाला दिलाय कौल हे आज उघड होणार




**माथेरान ।** माथेरान नगरपरिषदेची सार्वत्रिक निवडणूक दि. २ डिसेंबर रोजी अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली होती. या निवडणुकीचा निकाल उद्या दि.२१ रोजी सकाळी दहा वाजल्यापासून अधीक्षक कार्यालयात सुरू होणार आहे.या निवडणुकीत शिवसेना-भाजप महायुती आणि राष्ट्रवादी काँग्रेस आणि युबीटी गटाच्या शिवराष्ट्र पॅनल मध्ये दुरंगी लढत झाली आहे.

थेट नगराध्यक्ष पदासाठी महायुती कडून चंद्रकांत चौधरी तर शिवराष्ट्र पॅनल कडून माजी नगराध्यक्ष अजय सावंत हे उमेदवार होते. काही प्रभागात अपक्ष उमेदवारांनी सदस्य पदासाठी आपले नशीब अजमावण्यासाठी प्रयत्न केले आहेत. सर्व पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आपले उमेदवार निवडून येण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केलेली आहे. त्यामुळे उद्या दि.२१ रोजी सकाळी दहा वाजल्यापासून अधीक्षक कार्यालयात निकाल जाहीर होणार आहेत तसेच सर्वच कार्यकर्त्यांना कार्यालयाबाहेर विविध ठिकाणी नियोजित केल्याप्रमाणे उभे राहण्यासाठी जागा निश्चित केल्या असून कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे.

जवळपास चाळीस पोलिस यावेळी उपस्थित राहणार आहेत. एकूण दहा प्रभागात वीस उमेदवार सदस्य पदासाठी आणि थेट निवडणुकीमध्ये दोन्ही गटाचे उमेदवार आपले नशीब अजमावणार आहेत. दरम्यान आपल्याच पक्षाची सत्ता स्थापन होणार असून नगराध्यक्ष आमचाच होणार याबाबत कार्यकर्त्यांमध्ये चर्चा सुरू असून अनेक दिवसांपासून मतांची आकडेवारी करण्यात उमेदवारांसह कार्यकर्ते मग्न दिसत होते.

शिवराष्ट्र पॅनेलच्या कार्यकर्त्यांना सुध्दा ठाम विश्वास आहे की आमचे एकूण १४ उमेदवार आणि नगराध्यक्ष विजयी होतील तर महायुतीच्या कार्यकर्त्यांनी सुध्दा १२ जागांवर शिक्कामोर्तब करत नगराध्यक्ष आमचा होईल असा दावा केला आहे.

अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडलेल्या या निवडणुकीत माथेरान वर वर्चस्व कुणाचे आणि सत्तेत सहभागी कोण होणार याबाबत मतदारांनी कुणाच्या बाजूने कौल दिला आहे हे रविवार दि.२१ रोजी स्पष्ट होणार आहे.

# माणगाव येथील द. ग. तटकरे महाविद्यालयात राज्यस्तरीय प्राध्यापक विकास कार्यक्रम उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । माणगाव**

रायगड येथील माणगाव शिक्षण प्रसारक मंडळ संचलित द. ग. तटकरे महाविद्यालयाच्या व्यवस्थापन अभ्यास विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (खट-उ) यांच्या संयुक्त विद्यमाने, महाराष्ट्र राज्य प्राध्यापक विकास अकादमी, पुणे यांच्या सहकार्याने व पीएम-उषा प्रायोजित व्यवस्थापन अभ्यासात बौद्धिक संपदा हक्क या विषयावरील राज्यस्तरीय एकदिवसीय प्राध्यापक विकास कार्यक्रम दि. १८ डिसेंबर २०२५ रोजी यशस्वीरीत्या पार पडला.


हा कार्यक्रम संस्थेचे अध्यक्ष ड. राजीव साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे पदाधिकारी डॉ. आबासाहेब पाटणकर अध्यक्षस्थानी होते. दीपप्रज्वलन, सरस्वती पूजन व महाराष्ट्र गीत सादरीकरणाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. गुरुराज डांगरे (प्रमुख, व्यवस्थापन विभाग, स्टार्ट-अप, इनक्युबेशन व इनोव्हेशन, प्रतिभा इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, चिंचवड, पुणे), मा. प्रा. सौ. उन्मेषा पाटील (संचालक, नवोपक्रम, बौद्धिक संपदा हक्क व उद्योजकता, विश्वकर्मा विद्यापीठ, पुणे) आणि मा. श्री. प्रतिक धमाल (व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य प्राध्यापक विकास अकादमी, पुणे) हे मान्यवर उपस्थित होते. प्राचार्य डॉ. बी. एम. खामकर यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाची उद्दिष्टे व महत्त्व विशद केले. कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात प्रा. गुरुराज डांगरे यांनी बौद्धिक संपदा हक्कांचे स्वरूप, त्याचे महत्त्व व व्यवस्थापन शिक्षणातील प्रत्यक्ष उपयोग यावर सखोल मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात प्रा. सौ. उन्मेषा पाटील यांनी नवोपक्रम, पेटंट प्रक्रिया आणि उद्योजकतेमध्ये बौद्धिक संपदा हक्कांची निर्णायक भूमिका स्पष्ट करत सहभागी प्राध्यापकांना मार्गदर्शन केले. समारोप सत्रात सहभागी प्राध्यापकांनी कार्यक्रमाबाबत समाधानकारक व सकारात्मक अभिप्राय व्यक्त केला. उपस्थितांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. आभार प्रदर्शन व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. तेहसिन राऊत व प्रा. अश्विनी शेलार यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. जे. आर. पांडेय यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपप्राचार्य प्रो. आर. एम. आचार्य, व्यवस्थापन अभ्यास विभाग प्रमुख प्रा. आयेशा बडे, तसेच प्रा. सुष्मिता म्हामुणकर, प्रा. मंजिरी सावंत, प्रा. शाश्वती महाडीक आणि महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. या कार्यशाळेमुळे उपस्थित प्राध्यापकांना स्टार्ट-अप, नवोपक्रम व उद्योजकता क्षेत्रातील बौद्धिक संपदा हक्कांविषयी उपयुक्त व अद्ययावत मार्गदर्शन मिळाल्याचे मत सहभागी प्राध्यापकांनी व्यक्त केले. राज्यातील विविध महाविद्यालयांतील प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माणगावच्या स्वरा बामगुडेची रायगड जिल्हा क्रिकेट संघात निवड

**दै.रायगड नगरी । माणगाव**



माणगाव शहराच्या क्रीडा आणि शैक्षणिक क्षेत्राला अभिमान वाटावा अशी आनंदाची बातमी आहे. माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या सुधाकर नारायण शिपुरकर व गणेश यशवंत वाघरे इंग्रजी माध्यम शाळेची माजी विद्यार्थिनी, कुमारी स्वरा नंदिनी नितीन बामगुडे हिची रायगड जिल्हा मुलींच्या क्रिकेट संघात निवड झाली असून, तिच्या या यशाने संपूर्ण माणगाव शहर भारावून गेले आहे. एका सर्वसामान्य कुटुंबातील मुलीने कठोर परिश्रम, शिस्त आणि जिद्दीच्या जोरावर जिल्हास्तरावर आपले नाव कोरणे ही केवळ वैयक्तिक नव्हे, तर संपूर्ण शहरासाठी प्रेरणादायी यशकथा ठरली आहे.

स्वरा ही केवळ उत्कृष्ट क्रिकेटपटूच नाही, तर अभ्यासातही तितकीच चमकदार आहे. इयत्ता दहावीच्या परीक्षेत ९५ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावणारी स्वरा सध्या नवी मुंबईच्या नेरुळ येथील डॉ. डी. वाय. पाटील कॉलेजमध्ये उच्च शिक्षण घेत आहे. शिक्षणासोबत क्रीडा क्षेत्रातही आपली वाटचाल ती तितक्याच आत्मविश्वासाने करत असून, येथील भव्य स्टेडियममध्ये भारत रत्न 'मास्टर ब्लास्टर' सचिन तेंडुलकर क्रिकेट अकॅडमीत ती नियमित सराव करत आहे.

माणगाव येथील शिपुरकर व वाघरे शाळेत शिक्षण घेत असतानाच स्वऱाने क्रिकेटची स्वप्ने पाहायला सुरुवात केली. पहाटे सकाळी सहा वाजता धनसे मैदानावर घाम गाळत घेतलेले क्रिकेटचे प्राथमिक धडे आज तिच्या यशाचा मजबूत पाया ठरले आहेत. या प्रवासात शाळेच्या व्यवस्थापनाने, शिक्षकांनी आणि क्रीडा प्रशिक्षकांनी तसेच आई नंदिनी व वडील नितीन बामगुडे यांनी तिला वेळोवेळी प्रोत्साहन देत तिच्या स्वप्नांच्या पंखांना बळ दिले. सध्या नवी मुंबई येथे दररोज तीन सत्रांत कठोर सराव करत असलेली स्वरा ही यष्टिरक्षक आणि आघाडीची फलंदाज असल्याने ती दुहेरी मेहनत घेत आहे. तिच्या खेळातील सातत्य, तांत्रिक कौशल्य, आत्मविश्वास आणि जिद्द पाहून महाराष्ट्र राज्य क्रिकेट निवड समितीने तिला रायगड जिल्हा क्रिकेट संघात महत्त्वाचे स्थान देत माणगावच्या या उदयोन्मुख प्रतिभेचा गौरव केला आहे. लवकरच ती महाराष्ट्रातील विविध शहरांमध्ये होणाऱ्या स्पर्धांमध्ये रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे.

स्वरा बामगुडे हिच्या या उल्लेखनीय निवडीबद्दल खासदार सुनील तटकरे, मंत्री आदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे, संस्थेचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे, सर्व संचालक, चेअरमन अरुण पवार, मुख्याध्यापिका मनिषा मोरे, शिक्षक वृंद तसेच क्रीडाप्रेमींनी तिचे मनापासून अभिनंदन केले आहे. शाळेतील विद्यार्थ्यांनी जल्लोष करत स्वऱाला पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

# पुष्पक नगरचा प्रचार व प्रसार व्हावा या उद्देशाने दिशा बहुउद्देशीय सेवा संस्थेच्या मार्फत पुष्पक नगर प्रॉपर्टी एक्सपो २०२५ चे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ बाधित प्रकल्पग्रस्तांसाठी पुष्पक नगर निर्माण होत आहे. मात्र विमानतळा शेजारी असून सुध्दा पुष्पक नगरचा प्रचार व ज्या प्रकारे प्रचार व प्रसार व्हायला हवा होता तसा झालेला नसल्याने येथील स्थानिक भूमिपूत्र व त्यांच्या सोबत काम करणारे बांधकाम व्यवसायिक यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. या सर्व समस्या सोडविण्यासाठी दिशा बहुउद्देशीय सेवा संस्थेच अध्यक्ष सुनिल काशिनाथ कटेकर यांनी पुढाकार घेवून पुष्पक नगर प्रॉपर्टी एक्सपो २०२५ चे आयोजन केले असल्याची माहिती आज काळभैरव मंदिर, आर ३, चिंचपाडा येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये दिले .

या पत्रकार परिषेदेला बांधकाम व्यवसायिक अनिल सिंघवी , नागेश सुरवसे , सुनिल काशिनाथ कटेकर, संतोष सुतार आदी मान्यवर उपस्थित होते . सदर पुष्पक नगर प्रॉपर्टी एक्सपो २०२५ हे २२ ते ३१ डिसेंबर २०२५ दरम्यान रोटरी पनवेल फेस्टिव्हल, कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी , पनवेल येथे करण्यात आले असून पुष्पक नगर हे आगामी काळात सर्वाधिक गतिमान आणि प्रतिष्ठित ठिकाण म्हणून ओळख होणार असून जास्तीत जास्त लोकांनी येथे आपली घरे घ्यावीत यासाठी पुष्पक नगर प्रॉपर्टी एक्सपो २०२५ चे आयोजन केले असल्याची माहिती सुनिल काशिनाथ कटेकर यांनी दिली . आगामी काळात सिडकोसह इतर शासकीय यंत्रणेच्या माध्यमातून या भागाचा विकास होणार आहे .

पुष्पक नगर ही वेगळी ओळख लोकांना दिसणार आहे . विमानतळापासून हाकेच्या अंतरावर हे नगर असल्याने लोकांना याठिकाणी राहण्यास आवडणार आहे . या भागातील प्रकल्पग्रस्त बांधकाम व्यवसायिक याना बरोबर घेऊन हे पुष्पक नगर प्रॉपर्टी एक्सपो २०२५ चे आयोजन केल्याची माहिती अनिल सिंघवी यांनी दिली . तरी जास्तीत जास्त पनवेलवासीय व नवीमुंबई परिसरातील नागरिकांनी या प्रॉपर्टी एक्सपो २०२५ मध्ये सहभाग घेवा . असे अहवाहन संतोष सुतार यांनी केले आहे .

# उरणच्या राहुल पाटीलची कर निरीक्षकपदी नियुक्ती

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण नगरपरिषदेच्या माँ साहेब मिनाताई ठाकरे वाचनालयातील अभ्यासिकेत दोन वर्षापासून अभ्यास करणाऱ्या माजी सैनिक राहुल पाटील यांनी नुकत्याच लागलेल्या एम पी एस सी परीक्षेमध्ये यश मिळवले आहे. त्याची कर निरीक्षक पदाकरिता नियुक्ती करण्यात आली आहे .

दोन वर्षांपूर्वी तत्कालीन जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली उरण नगरपरिषदेच्या वाचनालयात अभ्यासिका सुरू करण्यात आली आहे.

दररोज अनेक विद्यार्थी सकाळी आठ ते रात्री उशिरापर्यंत सलग दहा - बारा तास अभ्यास करतात. विविध परीक्षांमध्ये यापूर्वी अनेक विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे.

आता एम पी एस सी परीक्षेत माजी सैनिक राहुल पाटील यांनी यश मिळवले आहे. राहुल पाटील यांची कर निरीक्षक या पदाकरता निवड झाली आहे. या निवडीबद्दल ग्रंथपाल संतोष पवार सहाय्य कर्मचारी जयेश वत्सराज, अँड. निरंतर सावंत आणि सर्व विद्यार्थी यांनी त्याच्या अभिनंदन केले.

उरण नगर परिषदेच्या अभ्यासिकेमध्ये दररोज अनेक विद्यार्थी सकाळी आठ ते रात्री उशिरापर्यंत सलग दहा-बारा तास अभ्यास करीत असून विविधस स्पर्धांची तयारी करीत आहेत.

# मिलिंद पाटील यांच्या नेतृत्वात एमजीपी अधिकाऱ्यांची वाशी-शिर्की पाईपलाईनची पाहणी

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील वाशी-शिर्की या खारेपाट विभागाला गेल्या अनेक वर्षांपासून पाणीटंचाईचा गंभीर प्रश्न कायम भेडसावत असून कित्येक दिवसांनी पाणीपुरवठा होत आहे.येथे शहापाडा धरणांमधून एमजीपीच्या योजनेतून पाइपलाईन व्दारे पाणीपुरवठा केला जातो. पण पाण्याच्या फोर्समुळे हि लाईन वारंवार ब्रेक होत आहे. लाईन ब्रेकडाऊनमुळे तीन दिवसांचा गॅप कधी सहा दिवसांपर्यंत जा-तो. याचा सर्वाधिक त्रास महिला वर्गाला सहन करावा लागत आहे. शेवटच्या टोकापर्यंत पाणी कधी पोहोचणार, हा प्रश्न स्थानिक नागरिकांसमोर उभा राहिला आहे.

या पार्श्वभूमीवर समस्येचे निवारण करण्यासाठी भारतीय जनता पार्टीचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद पाटील यांच्या नेतृत्वाखाली सामाजिक कार्यकर्ते मंगल पाटील, वाशी माजी सरपंच गोरख पाटील, शिर्की तंटामुक्ती अध्यक्ष शेखर पाटील, सामाजिक कार्यकर्ते सदाशिव म्हात्रे, नयन पाटील व कार्यकर्ते यांनी दोन दिवसांपूर्वी एमजीपी कार्यालय, पनवेल येथे कार्यकारी अभियंता पांढरपट्टे यांची भेट घेऊन प्रत्यक्ष जागेवर येऊन पाहणी करण्याची विनंती केली होती. या मागणीला मान देत कार्यकारी अभियंता पांढरपट्टे व ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी यांनी आज दिनांक १८ डिसेंबर रोजी स्वतः खारेपाट विभागातील शिर्की पाण्याची टाकी,वाशी पाण्याची टाकी तसेच पाईपलाईनची पाहणी केली.

बोरी फाटा ते शिर्की दरम्यानची जीर्ण जलवाहिनी बदलून एसटीपीमार्फत नव्या लाईनद्वारे पूर्ण दाबाने पाणीपुरवठा करण्याचे आश्वासन यावेळी देण्यात आले. वाशी, शिर्की व वढाव येथील पाण्याच्या टाक्या लवकरात लवकर भरल्या जातील, तसेच टाक्या पूर्ण भरेपर्यंत शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहोचवले जाईल, असे स्पष्टीकरण एमजीपीचे कार्यकारी अभियंता पांढरपट्टे यांनी दिले स्थानिक आमदार व खासदारांच्या माध्यमातून आलेल्या निधीच्या योग्य अंमलबजावणीचे आश्वासन देत, दोन महिन्यांत पाणीप्रश्नाला ७० ते ८० टक्के न्याय देता येईल, असे भाजप सरचिटणीस मिलिंद पाटील यांनी सांगितले.



अर्जदारांचे वकील ॲड.रूपेश राम म्हात्रे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे दिवाणी न्यायाधिश क. स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१५२०/२०२५

नि.नं.७

ने.ता.०३/०१/२०२६

कै. जनार्दन उर्फ जनारधन लक्ष्मण पाटील मयतचे वारस
१. श्रीमती. पार्वती जनार्दन उर्फ जनारधन पाटील
वय-६३ वर्ष, व्यवसाय-गृहीणी,
२.श्री. प्रवीण जनार्दन उर्फ जनारधन पाटील.
वय-४४ वर्ष, व्यवसाय-नोकरी,
३. श्री. रंजित जनार्दन उर्फ जनारधन पाटील.
वय-३९ वर्ष, व्यवसाय-नोकरी,
अर्जदार क्र. १ ते ३ पत्ता. मू. कोपर,
पो. गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड
४. सौ. सूगंधा गणेश तांडेल
वय-४३ वर्ष, व्यवसाय-गृहीणी,
मू.सावरखार, पो.जे.एन.पी.टी.नोड, ता. उरण, जि. रायगड,
५. सौ. सूवर्णा सतिश घरत
वय.-३८ वर्ष, व्यवसाय-गृहीणी,
रा.बाळू नागू अपार्टमेंट, प्लॉट नं.२०१, सदनिका क्र ३११,
नविन वरचे ओवळे, पो. पारगाव, ता.पनवेल — अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही

सदरहू वरील अर्जदार यांनी कै. जनार्दन उर्फ जनारधन लक्ष्मण पाटील यांचा वारस दाखला (हेअरशिप सर्टीफिकेट) मिळण्यासाठी या मे कोर्टात दिवाणी चौकशी अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांना शासकीय कामाकरिता वारस दाखल्याची आवश्यकता आहे. कै. जनार्दन उर्फ जनारधन लक्ष्मण पाटील याचे दि.२६.०१.२०१७ रोजी लाईफ लाइन हॉस्पीटल पनवेल ता. पनवेल जि.रायगड येथे निधन झाले आहे. तसेच त्यांची आई कै. यमूनाबाई लक्ष्मण पाटील यांचे दि.२३.०८.१९८२ रोजी मू.कोपर पो. गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड येथे निधन झाले आहे. त्यापेक्षा सरदहू अर्जदार कै. जनार्दन उर्फ जनारधर लक्ष्मण पाटील यांचे वारसदार नाहीत असे कोणाला समजविण्याचे असेल आणि वारसदाखल्याबददल कोणाचे हक्क अथवा हितसंबंध असतील किंवा कोणत्याही प्रकारची हरकत असेल त्यांनी तशी लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून १ महीन्याच्या आत या मे. कोर्टात हजर होउन दाखल करावी.

वरील मूदतीत कोणीही योग्य हरकती न दाखविल्यास हे मे. कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबददल लागलीच पूरावा घेवून अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांस सदरहू मयताचे वारस म्हणून वारस दाखला (हेअरशिप सर्टीफिकेट) अर्जदारांच्या लाभांत देईल. नंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि. ०३/१२/२०२५ रोजी मे कोर्टाच्या सही शिक्यानिशी दिली.

| सही/- | | सही/- |
|---|---|---|
| क.लिपीक | कोर्टाचा शिक्का | सहा.अधिक्षक |
| दि.न्या.क.स्तर, पनवेल | | दि.न्या.क.स्तर, पनवेल |

# धावत्या ट्रेनमधून विद्यार्थिनीला खाली फेकले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल-सीएसएमटी ट्रेनच्या महिलांच्या डब्यात प्रवेश करुन एका १८ वर्षांच्या महाविद्यालयीन विद्यार्थिनीला धावत्या ट्रेनमधून खाली ढकलल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. श्वेता महाडिक असे या विद्यार्थिनीचे नाव आहे. गंभीर जखमी झालेल्या श्वेताच्या जबानीनंतर रेल्वे पोलिसांनी शेख अख्तर नवाज नावाच्या आरोपीला अटक केली आहे.

श्वेता तिच्या मैत्रीणीसह खारघर येथील महाविद्यालयात जाण्यासाठी निघाली होती. दोघींनी पनवेल स्थानकावर पनवेल-सीएसएमटी लोकल पकडली. दोघीही लोकलच्या महिलांच्या डब्यात चढल्या. त्याचवेळी आरोपी शेखही महिलांच्या डब्यात शिरला. तेव्हा इतर महिलांनी त्याला डब्यातून खाली उतरण्यास सांगितले असता चिडलेल्या शेखने डब्याच्या दरवाजाजवळ उभ्या असलेल्या श्वेताला धावत्या ट्रेनमधून खाली ढकलले.

श्वेता ट्रेनमधून खाली पडताच महिला प्रवाशांनी तात्काळ ट्रेनची चेन खेचून रेल्वे हेल्पलाइन क्रमांकावर माहिती दिली. यानंतर लोकल खांदेश्वर स्थानकात येताच जीआरपी पोलिसांनी शेखला ताब्यात घेतले. खाली पडलेल्या श्वेताच्या डोक्याला, कंबरेला आणि हाता-पायाला गंभीर जखमा झाल्याने तिला तात्काळ कळंबोली येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले.



**जाहीर नोटीस**

सर्व तमाम लोकांस कळविण्यात येते मौजे पिसार्वे, तालुका-पनवेल, जि.रायगड, येथील रहिवासी श्री. विशाल बाळाराम म्हात्रे व श्री. विशाल बाळाराम पावशे हे दोन्ही नावाच्या एकच व्यक्ती आहेत व तसेच श्री. दत्ता बाळाराम म्हात्रे व श्री. दत्ता बाळाराम पावशे या दोन्ही नावाच्या व्यक्ती एकच असुन, सदर नावांकरिता कोणाचाही कोणत्याही प्रकारची तक्रार असल्यास संबंधितांनी सदरील नोटीस प्रसिध्द झालेपासुन १४ (चौदा) दिवसांचे आत आमचे खालील पत्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. अथवा सदर नावांकरिता कोणाचीही कोणतीही तकार नाही असे समजुन सर्वसंबंधितांनी आपाआपल्या तथाकथित हरकती व तकारी कायमच्या सोडुन दिल्या आहेत असे समजणेत येईल व मुदतबाहय हरकत विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली असे.

दि.२१/१२/२०२५

सही/-

**ॲड.सुदेश गव्हाणे**

**ऑफीस नं.४ व ५,१ला मजला तेजस्विनी आर्केड, युनिटी स्मॉल फायनान्स बँकेच्या वर, के मॉल जवळ स्टेशन तक्का रोड पनवेल, फोन.नं. ९८३३३६३६२६**

# पनवेलमध्ये आज ‘एक धाव मतदानासाठी’ महिलांची भव्य मॅरेथॉन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका आणि रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल यांच्या संयुक्त विद्यमाने ‘रोटरी मॅरेथॉन २०२५’ अंतर्गत मतदान जागरूकतेसाठी ‘एक धाव मतदानासाठी’ या संकल्पनेवर आधारित महिलांची भव्य मॅरेथॉन आज रविवार दि. २१ डिसेंबर रोजी वडाळे तलाव, पनवेल येथे आयोजित करण्यात आली आहे. लोकशाही बळकट करण्यासाठी महिलांचा सक्रिय सहभाग वाढावा, मतदानाबाबत जनजागृती व्हावी, या उद्देशाने या मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे.

वडाळे तलाव परिसरातून मॅरेथॉनला सुरुवात होणार असून ३ किमी आणि ५ किमी अशा दोन गटांमध्ये ही दौड होणार आहे. शहरातील तसेच परिसरातील महिलांसाठी ही मॅरेथॉन खुली असून, विविध वयोगटातील महिलांचा उत्स्फूर्त सहभाग अपेक्षित आहे. सकाळी ६ वाजता मॅरेथॉनला प्रारंभ होणार असून, संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मॅरेथॉनमध्ये सहभागी होणाऱ्या सर्व महिलांसाठी आयोजकांच्या वतीने विशेष सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. सहभागी महिलांना आकर्षक टी-शर्ट, इळल, रिफ्रेशमेंट, सहभाग प्रमाणपत्र, मेडल तसेच सर्व महिलांना तडउउ कुपन्स देण्यात येणार आहेत. त्यामुळे आरोग्य, फिटनेस आणि सामाजिक जबाबदारी यांचा सुंदर संगम या मॅरेथॉनमध्ये पाहायला मिळणार आहे. या उपक्रमामागील मुख्य उद्दिष्ट म्हणजे महिलांमध्ये मतदानाबाबत जागरूकता निर्माण करणे, लोकशाही प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढवणे तसेच आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देणे. महिलांनी स्वतः मतदान करावेच, शिवाय कुटुंबातील व परिसरातील नागरिकांनाही मतदानासाठी प्रेरित करावे, हा या अभियानाचा मुख्य संदेश आहे. रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलचे मार्गदर्शक डॉ. गिरीश गुणे आणि प्रेसिडेंट अनिल ठकेकर यांनी पनवेल शहरासह परिसरातील जास्तीत जास्त महिलांनी या मॅरेथॉनमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन करीत एक धाव मतदानासाठी या घोषवाक्याखाली महिलांचा उत्स्फूर्त सहभाग लोकशाहीला नवी ऊर्जा देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

पनवेल महानगरपालिका आणि रोटरी क्लबच्या या उपक्रमामुळे मतदान जागरूकतेसह महिलांच्या आरोग्य, सशक्तीकरण आणि सामाजिक भानाला चालना मिळणार असून, वडाळे तलाव परिसरात आज महिलांच्या उत्साहाचा आणि लोकशाही जागृतीचा सुंदर संगम पाहायला मिळणार आहे.

# गेली सहा वर्षे काळसुरी ग्रामस्थांचा पाण्यासाठी संघर्ष ; ग्रामस्थ हंडामोर्चा काढण्याच्या तयारीत

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

रायगड जिल्ह्यातील म्हसळा तालुक्यातील काळसुरी गावात नोव्हेंबर महिन्यापासून तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. शासनाने सुमारे सहा वर्षांपूर्वी सुरू केलेल्या पेयजल योजनेचे काम अद्याप अपूर्ण असल्याने ग्रामस्थांना गंभीर अडचणींना सामोरे जावे लागत आहे.गेली सहा वर्षे काळसुरी ग्रामस्थ पाण्यासाठी संघर्ष करीत आहेत.

काळसुरी गावात सन २००४ पासून पथदर्शी योजनेअंतर्गत पाणीपुरवठा होत होता; मात्र या योजनेअंतर्गत टाकण्यात आलेली पाईपलाईन सध्या पूर्णतः जीर्ण झाली असून वारंवार नादुरुस्त होत आह. जागोजागी पाईप फुटण्याचा प्रकारात दिवसेंदिवस वाढ होत आह . परिणामी सध्या गावात पिण्याचे पाणी येत नसून ग्रामस्थ त्रस्त झाले आहेत.

पिण्याच्या पाण्यासाठी गावातील महिलांना एक ते दीड किलोमीटर अंतरावरील विहिरीवरून डोक्यावर हंडे घेऊन पाणी आणावे लागत आहे. नाईलाजास्तव काही ठिकाणी दूषित पाणी वापरावे लागत असल्याने मागील एका महिन्यापासून कावीळ, हगवण यांसारखे पोटाचे आजार लहान मुलांसह अनेक ग्रामस्थांना होत आहेत. तसेच गावात डेंगूचे तीन रुग्ण आढळून आले असून त्यापैकी एकाचा मृत्यू झाला आहे.

जुनी पाईपलाईन दुरुस्त करण्यासाठी ग्रामस्थांना वारंवार श्रमदान करावे लागत आहे. पाण्याच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी सतत बैठका घ्याव्या लागत असल्याने ग्रामस्थांचे आर्थिक नुकसानही होत आहे. पेयजल योजनेचे अपूर्ण काम आणि पाणीटंचाईबाबत तालुक्यातील पाणीपुरवठा अधिकारी फुलपगारे यांच्याकडे वारंवार तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस दखल घेण्यात आलेली नाही. मात्र या समस्येचे अद्याप निराकरण झालेले नाही. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

शासनाने काळसुरी गावाची पाण्याची समस्या तातडीने सोडवावी, अन्यथा तालुक्यातील पाणीपुरवठा कार्यालयासमोर ग्रामस्थांच्या वतीने हंडा मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा काळसुरी ग्रामपंचायत सरपंच राजेंद्र घोसाळकर, उपसरपंच विनया पेरवी, गाव अध्यक्ष संतोष नाक्ती, पाणीपुरवठा गाव कमिटी अध्यक्ष तुकाराम चाळके, जगदीश घोसाळकर, प्रमोद पेरवी, आकाश पेरवी, ग्रामपंचायत सदस्य तसेच गावातील सर्व महिला व पुरुष ग्रामस्थांनी दिला आहे.

## इंडियन स्ट्रीट प्रीमियर लीगमध्ये जासईच्या साहिल म्हात्रेंची निवड



**दै.रायगड नगरी । पनवेल**

उरण तालुक्यातील जासई गावातील साहिश सुरेश म्हात्रे याची भारतातील सर्वात मोठ्या टेनिस क्रिकेट स्पर्धा इंडियन स्ट्रीट प्रीमियर लीगमध्ये सिनेस्टार अक्षय कुमार यांच्या मालकीच्या श्रीनगर के वीर या संघात निवड झाली आहे. या निवडीबद्दल भाजपचे नेते, माजी नगराध्यक्ष जे एम म्हात्रे, पनवेल पालिकेचे माजी विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे यांनी त्याचे अभिनंदन केले.

# भूमिपुत्रांच्या छाताडावर विमानतळ : महेंद्रशेठ घरत




**दै.रायगड नगरी । उलवे**

मंडळ आयोग आणि ओबीसींच्या लढ्यात दिबा अग्रणी होते. साडेबारा टक्के जमिनीचा कायदा देशभर लागू झाला दिबांच्या आंदोलनांमुळेच, १९८४ च्या आंदोलनात पाच हुतात्मे झाले. त्यांच्या बलिदानामुळे. सिडकोचा डोलारा भूमिपुत्रांमुळेच उभा आहे. शेतकऱ्यांच्या जमिनी १५ हजार रुपये एकरी सिडकोने घेतल्या. त्याच जमिनीवर अब्जावधी रुपये सिडको आज कमावतेय. भाजप हे संधीसाधू राजकारण करतेय; परंतु दिबांच्या नावाबाबत जो चालढकलपणा सुरू आहे तो सर्वसामान्य भूमिपुत्र सहन करणार नाही. त्यामुळे आम्हा सर्वांची अस्मिता, अभिमान फक्त दिबाच!

महेंद्रशेठ पुढे म्हणाले, दिबा हे अतिशय साधे आणि नि:स्वार्थी जीवन जगले. हातावर पोट असणाऱ्या ग्रामस्थांनी त्यांचे घर बांधले. राज्यात, देशात जिथे जिथे सर्वसामान्यांवर सरकारने अन्याय-अत्याचार केला तेव्हा दि. बा. पाटील साहेब पेटून उठले. भूमिपुत्रांचे तर ते तारणहार आहेत. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे भूमिपुत्रांच्या छाताडावर वसले आहे. भूमिपुत्रांच्या असीम त्यागामुळेच विमानतळ साकारलेय. कारण भूमिपुत्रांनी फक्त जमिनीच दिल्या नाहीत तर घरादारांवर तुळशीपत्र ठेवले. दिबांमुळेच भूमिपुत्रांना काही अंशी न्याय मिळाला, जागतिक पातळीवर जे काही नेते समाजासाठीच जगले, त्यात दिबांचे नाव आघाडीवर असेल. दिबा हे राष्ट्रीय नेतेच आहेत आणि त्यांचेच नाव विमानतळाला हवे, त्यामुळे भूमिपुत्र प्रकल्पग्रस्तांच्या सहनशीलतेचा सरकारने अंत पाहू नये, असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत गव्हाण येथे म्हणाले. त्यांच्या हस्ते ४० प्लस क्रिकेट टुर्नामेंटचे उद्घाटन शनिवारी झाले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी उद्योजक मनोज फडकर, जय श्रीराम ४० प्लस क्रिकेट क्लब गव्हाण आणि ग्रामस्थ उपस्थित होते. तसेच उपसरपंच चषक, पाले-उरण चषकाचे उद्घाटनही महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते झाले. यावेळी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष विनोद म्हात्रे, आवरे सरपंच निराबाई पाटील, उरण युवक अध्यक्ष नितेश पाटील, पिरकोन सदस्य मंगेश म्हात्रे, आर. बी. म्हात्रे, रामचंद्र म्हात्रे, आनंद ठाकूर, राजेंद्र भगत, संजय म्हात्रे, विजय म्हात्रे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन सुनील वर्तक सर यांनी केले. आयोजक माजी उपसरपंच समाधान म्हात्रे आणि सहकारी होते.

# मतमोजणीच्या पार्श्वभूमीवर सोशल मीडियावर कडक निर्बंध

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्ह्यातील नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या मतमोजणीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने सोशल मीडियाबाबत अत्यंत कठोर भूमिका घेतली आहे. नागरिकांना जाहीर इशारा देण्यात आला आहे. मतमोजणी दरम्यान तसेच निकाल जाहीर झाल्यानंतर सोशल मीडियावर कोणत्याही प्रकारच्या अफवा, चिथावणीखोर, वादग्रस्त किंवा समाजात तेढ निर्माण करणाऱ्या पोस्ट, कमेंट, व्हिडीओ, ऑडिओ, बॅनर प्रसारित करू नयेत, असे स्पष्ट निर्देश प्रशासनाकडून देण्यात आले आहेत.

प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, राजकीय, सामाजिक किंवा धार्मिक व्यक्ती, गट अथवा समाजाच्या भावना दुखावणाऱ्या आशयावर ‘शून्य सहनशी-लता’ ठेवण्यात येणार आहे. अशा प्रकारचा मजकूर तयार करणे, पोस्ट करणे किंवा फॉरवर्ड करणे हे कायद्याने दंडनीय ठरणार आहे. संबंधित व्यक्तीविरोधात तात्काळ कारवाई केली जाईल. विशेष म्हणजे, केवळ पोस्ट करणारी व्यक्तीच नव्हे तर ती पोस्ट शेअर करणारे ग्रुप सदस्य आणि संबंधित व्हॉट्सप किंवा सोशल मीडिया ग्रुपचे ॲडमिन यांनाही जबाबदार धरले जाणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

या पार्श्वभूमीवर, सर्व सोशल मीडिया ग्रुप ॲडमिनना मतमोजणी आणि निकालाच्या कालावधीत ‘जपश्रू -वाळप’ सेटिंग सुरू ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यामुळे कोणताही ग्रुप सदस्य वादग्रस्त किंवा भडक पोस्ट टाकणार नाही, याची खबरदारी घेता येईल. प्रशासनाने याबाबत ॲडमिनने सहकार्य न केल्यास त्यांच्यावरही कायदेशीर कारवाई होऊ शकते, असे ठामपणे सांगितले आहे.

दरम्यान, रायगड जिल्ह्यात सायबर सेलचे विशेष पथक सक्रिय करण्यात आले असून फेसबुक, व्हॉट्सप, इंस्टाग्राम, एक्स (ट्विटर) आदी सर्व सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर २४ तास लक्ष ठेवले जात आहे. कोणतीही अफवा, खोटी माहिती किंवा समाजात तणाव निर्माण करणारा मजकूर आढळल्यास तात्काळ त्याची दखल घेतली जाणार असून गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशाराही देण्यात आला आहे.

लोकशाहीचा हा महत्त्वाचा टप्पा शांततेत आणि कायद्याच्या चौकटीत पार पडावा, यासाठी नागरिकांनी संयम बाळ-गावा, अफवांवर विश्वास ठेवू नये आणि कोणतीही संशयास्पद पोस्ट आढळल्यास ती पुढे न पाठवता प्रशासनाच्या निदर्शनास आणावी, असे आवाहन जिल्हा प्रशासन आणि पोलिसांकडून करण्यात आले आहे. मतमोजणीच्या दिवशी शांतता आणि सुव्यवस्था राखणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



## डॉक्टरविरोधात बलात्काराचा गुन्हा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोलीत एका ५९ वर्षीय डॉक्टरने एका महिलेला लग्नाच्या भूलथापा देऊन गेल्या सात वर्षांपासून लैंगिक अत्याचार करत तिला लग्नास नकार देऊन मारहाण केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

कळंबोली पोलिसांनी पीडित महिलेच्या तक्रारीवरून आरोपी डॉक्टरविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

आरोपी डॉक्टर नेरूळ येथे राहण्यास असून त्याचा कळंबोली परिसरात दवाखाना आहे, तर ४९ वर्षीय पीडित महिला त्याच भागात राहण्यास असून दोघेही विवाहित असून त्यांना मोठी मुले आहेत.

डॉक्टरने पहिल्या पत्नीपासून घटस्फोट घेऊन पीडित महिलेसोबत विवाह करण्याचे आश्वासन दिले होते; मात्र डॉक्टरने तिला नकार देऊन मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

# रिक्षाच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रिक्षाने दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात सम्यक वानखेडे हा तरुण जखमी झाला. अपघाताप्रकरणी रिक्षाचालकाविरोधात खारघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

शशिकला वानखेडे या मानखुर्द पोलिस ठाण्यात शिपाई म्हणून कार्यरत आहेत. त्यांचा मुलगा सम्यक स्कूटीने पापडीचा पाडा बसथांब्याकडे जात असताना रिक्षाने अचानक यू टर्न घेतला आणि स्कूटीला धडक दिली.

अपघातात महिला पोलिस शशिकला वानखेडे आणि सम्यक दोघेही खाली पडले. यात सम्यक जखमी झाला. त्यानंतर रिक्षाचालकाने धक्काबुक्की करून पळ काढला. अपघातात दुचाकीचेही नुकसान झाले.

# काँग्रेसचा ठाकरेंना धक्का! ठाकरेंच्या शिवसेनेविरोधात निवडणूक लढवणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

शिवसेना ठाकरे गटाकडून महाविकास आघाडीत निवडणूक लढविण्याचे प्रयत्न सुरू असतानाच आघाडीचा भाग असलेल्या काँग्रेसने आपला स्वबळाचा नारा कायम ठेवला आहे. ही निवडणूक ठाकरेंची शिवसेना, भाजप विरोधात लढवणार असून धर्मनिरपेक्ष पक्षांनी काँग्रेससोबत यावे, असे आवाहन करताना काँग्रेसने सर्व २२७ जागांवर स्वबळावर लढण्याची तयारी केली असल्याचे काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी जाहीर केले.

काँग्रेसच्या राजकीय व्यवहार समितीची बैठक मुंबईत पार पडली. या बैठकीत मुंबई महापालिका निवडणुकीसंदर्भात चर्चा करण्यात आली. त्याचप्रमाणे २२७ जागांवर ९५० इच्छुकांच्या अर्जांचा आढावा घेण्यात आला. बैठकीनंतर बोलताना रमेश चेन्नीथला यांनी निवडणुका स्वबळावर लढवण्याबाबत पुनरुच्चार केला. लोकसभा व विधानसभेच्या निवडणुका महाविकास आघाडी म्हणून लढवल्या पण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढवाव्या अशी कार्यकर्त्यांची भावना आहे म्हणून मुंबई महानगरपालिका निवडणूक काँग्रेस पक्ष स्वबळावर लढवणार आहे, असे रमेश चेन्नीथला यांनी स्पष्ट केले.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मागील चार वर्षांपासून झालेल्या नाहीत. सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिल्याने या निवडणुका होत आहेत. निवडणुका व्हाव्यात अशी राज्य सरकारची इच्छाच नव्हती कारण सरकार थेट महापालिकेचा कारभार पहात होते. महानगर पालिका निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाने तयारी केली आहे. काँग्रेसच्या मुंबई अध्यक्षा वर्षा गायकवाड यांनी मुंबईकरांना विवाद नको तर विकास हवा आहे आणि काँग्रेसचा भर जनतेच्या मुद्द्यांवरच असेल. काही शक्ती जाती धर्माच्या नावाखाली वाद निर्माण करत आहेत पण काँग्रेस पक्ष विकासावर लक्ष केंद्रित करणार आहे. महानगरपालिकेची निवडणुक स्वबळावर लढवण्याचा निर्णय दोन महिन्यापूर्वी झालेल्या शिबिरातच झालेला आहे.


२८ वे

महोत्सव रोटरीचा... जल्लोष पनवेलकरांचा..

Rotary

यावर्षी कर्नाळा स्पोर्ट्स ॲकॅडमी मैदान

प्लॉट नं. ७, कालसेकर कॉलेज समोर, पनवेल येथे

दिनांक २२ डिसेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ सायं. ४ ते रात्री १० वा.

रोटरी क्लब ऑफ पनवेल व रोटरी फाऊंडेशन पनवेल आयोजित




१० रंगतदार दिवसांचा आनंद, मजा आणि उत्साह ❖ २+ लाख लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

संधी असंख्य आकर्षक ग्राहकोपयोगी वस्तु खरेदीची ❖ चवदार खाद्यपदार्थांची मेजवानी

आकर्षक करमणूकीच्या कार्यक्रमांची रेलचेल

स्टॉल बुकिंग साठी संपर्क : 91374 72736

२८ वे वर्ष एका अभिनव उपक्रमाचे... मनोरंजनाद्वारे समाजसेवेसाठी निधी संकलनाचे.


## जाहीर नोटीस

सर्वांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि निम्ननिर्दिष्ट मालमत्ता जमिन मालकांनी त्यांचे मालकीवहीवाटीची व निर्वेध आहे असा निर्वाळा दिला असून आमचे आशिलांस त्यांनी सर्व हक्क अधिकारासुद्धा कायम खरेदी देणेबाबत त्यांची आमचे आशिलाजवळ बोलणी चालू आहेत. तरी व्यवहारास कायदेशीर बाधा राहू नये व टायटल तपासणीचा भाग म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे. तरी सदर मिळकती संदर्भात अन्य कोणास गहाण, दान, बक्षिस, लीन, लीज, अन्नवस्त्र, पोटगी, अदलाबदल, हवा, उजेड, जाणेयेणेचा मार्ग, इजमेंट, वहिवाट, मृत्युपत्र ई. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क अधिकार असलेस त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसात प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी कळवावे. अन्यथा सदर नोटीस मुदत अखेर कथित हक्कअधिकार जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहीत धरून आमचे आशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणारे हरकतींचा विचार केला जाणार नाही.

वरीलप्रमाणे नोटीस प्रसिद्ध करणेत येत आहे.

**अ) मिळकतीचे वर्णन**

**मौजे-विरझोली, ता-रोहा, जिल्हा-रायगड येथिल मिळकत**

| अ.नं. | गट नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| १ | ४४८ | ०-६७-० यापैकी यमुना गजानन ठाकूर, रोहित गजानन ठाकूर, निखिल गजानन ठाकूर यांच्या अविभक्त हिश्याची | ०.६१ |
| २ | ६२५ | ०-१७-७० यापैकी यमुना गजानन ठाकूर, रोहित गजानन ठाकूर, निखिल गजानन ठाकूर यांच्या अविभक्त हिश्याची | २.१२ |

माणगाव
दि-२०-१२-२०२५

सही/-
**ॲड. राहुल प्र.ओक**
**मानस, मुंबई-गोवा हायवे**
**मु.पो.ता-माणगाव, जि-रायगड**
**मो.नं-८८८८३७३००५**
**(खरेदीदारातर्फे ॲड)**